# *वार्तापत्र*

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २७/०९/२०१८

## आपला महाराष्ट्र दर्शन योजनेची २१ वी सहल रवाना

### मा. अपर पोलीस महासंचालक श्री डी.कनकरत्नम यांनी दाखविला हिरवा झेंडा

गडचिरोली जिल्हा पोलीस दलातर्फे आपला महाराष्ट्र दर्शन सहल योजना राबविण्यात येते त्या अंतर्गत आज गडचिरोली पोलीस दलातर्फे २१ व्या महाराष्ट्र दर्शन सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. सन २०१३ पासुन जिल्हाभरातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील १६२६ मुला-मुलींनी सदर सहलीचा लाभ घेतलेला असुन आज रवाना करण्यात आलेल्या २१ व्या सहलीसाठी ८१ मुला-मुलींची निवड झाली आहे. यामध्ये नक्षल पिडीत व नक्षल्यांचे नातेवाईक यांचा देखील समावेश आहे. सदर सहली निमिताने आयोजित कार्यक्रमात उपस्थित विदयार्थ्यांना मार्गदर्शन करतांना मा. जिल्हाधिकारी श्री शेखर सिंग सा. यांनी सदर उपक्रम हा गडचिरोली पोलीस दलाचा स्तुत्य उपक्रम असुन विदयार्थ्यांनी याचा फायदा करुन घ्यावा असे आवाहन केले. यावेळी मा. अपर पोलीस महासंचालक (विशेष अभियान) श्री. डी. कनकरत्नम सा. यांनी सहलीस हिरवा झेंडा दाखवुन सहल रवाना केली. सदर वेळी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षल विरोधी अभियान), श्री. शरद शेलार सा., मा. पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र श्री. अंकुश शिंदे सा., मा. जिल्हाधिकारी गडचिरोली श्री. शेखर सिंग सा., मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली श्री. शैलेश बलकवडे सा., मा. अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) श्री. महेंद्र पंडित सा., मा.अपर पोलीस अधिक्षक (अभियान) डॉ.हरी बालाजी सा., मा.अपर पोलीस अधिक्षक (नक्षल सेल) डॉ. मोहीतकुमार गर्ग सा., मा. अपर पोलीस अधिक्षक अहेरी श्री. अजयकुमार बन्सल सा. हे उपस्थित होते.

नक्षलग्रस्त अशा गडचिरोली जिल्हयातील मुला-मुलींच्या उज्वल भवितव्यासाठी व त्यांच्या मनातील नक्षलवादयांचा प्रभाव कमी करण्यासाठी त्यांना

महाराष्ट्रातील विविध ठिकाणी झालेली औद्योगिक, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगतीची माहिती व्हावी तसेच राज्याच्या इतर भागातील रूढी व परंपरांचे दर्शन घडविण्यासाठी गडचिरोली पोलीस विभागामार्फत दरवर्षी आपला महाराष्ट्र सुवर्ण जयंती सहल योजना राबविली जाते. जिल्हयातील आदिवासी किशोरवयीन मुले-मुली महाराष्ट्र शासनाचे Ambassador म्हणून नक्षल प्रभावी क्षेत्रामध्ये बदल घडवतील हा उदात्त हेतू यामागे आहे.






# महाराष्ट्र दर्शन सहल क्र.२१
दि. २७ सप्टे. ते ४ ऑक्टो. २०१८